**:- प्रेस नोट -:**

कोल्हापूर जिल्हा पोलीस आस्थापनेवरील रिक्त असलेल्या १५४ पोलीस शिपाई पदाचे भरती प्रक्रियेतील शारिरीक व मैदानी चाचणी दि.१९.०६.२०२४ ते २८.०६.२०२४ या कालावधीत पोलीस परेड क्रिडांगण, पोलीस मुख्यालय या ठिकाणी घेण्यात आलेली आहे. मैदानी चाचणीत ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवारामधून जाहिरातील नमुद केलेल्या रिक्त पदांच्या ०१ : १० या प्रमाणात प्रवर्गनिहाय १४९६ उमेदवारांची लेखी परिक्षेसाठी निवड करण्यात आलेली आहे.

कोल्हापूर जिल्हा पोलीस भरती-२०२२-२३ मधील **पोलीस शिपाई पदासाठीचे** पात्र १४९६ उमेदवारांची लेखी परीक्षा **दिनांक १३.०७.२०२४ रोजी सायंकाळी १६.०० ते १७.३० वा.** या वेळेत **स्वामी विवेकानंद महाविदयालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय शेजारी, ताराबाई पार्क, कोल्हापूर** या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे. लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवाराना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध होणार आहे. परिक्षार्थी यांनी सदर परीक्षा केंन्द्रावर ०२ (दोन) तास अगोदर पोहचणे आवश्यक आहे.

तसेच कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई चालक पदाचे लेखी परीक्षेचा दिनांक नंतर जाहिर करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

10/07/24

(महेंद्र क.पंडित,भा.पो.से)
पोलीस अधीक्षक,कोल्हापूर

ठिकाण :- कोल्हापूर
दिनांक :- १०.०७.२०२४

प्रति,

संपादक, दैनिक-------------------

०२/- नमुद प्रेसनोट ही दिनांक ११.०७.२०२४ रोजीचे आपले दैनिकामध्ये जनहितार्थ विनामुल्य प्रसिध्द करण्यात यावी.